# सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १

# महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन अधिनियम, १९७६

१. **संक्षिप्त नाव व प्रारंभ.**—(१) या अधिनियमास महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन अधिनियम, १९७६ असे म्हणता येईल.

(२) तो राज्य शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नेमील अशा तारखेस अंमलत येईल.

२. **व्याख्या.**—संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसल्यास या अधिनियमात,—

(१) " राज्य विधानमंडळ सदस्य " म्हणजे महाराष्ट्र विधानसभेचा सदस्य किंवा महाराष्ट्र विधानपरिषदेचा सदस्य आणि त्यात पुढील सदस्यांचा समावेश होईल :—

(अ) मुंबई विधानसभा, मध्य प्रदेश विधानसभा किंवा हैद्राबाद विधानसभा यांपैकी कोणत्याही विधानसभेवर १९५२ साली त्या विधानसभेच्या सर्व निर्वाचन संघांना सदस्यांची निवड करण्याचे आवाहन ज्या सर्वात अगोदरच्या तारखेस करण्यात आले असेल (या खंडात यापुढे जिला " उक्त तारीख " असे म्हटले आहे) त्या तारखेस किंवा त्यानंतर निवडून आलेला सदस्य—

(एक) जर तो सदस्य म्हणून असतानाच मुंबई विधानसभेचा सदस्य म्हणूनही चालू राहिला असेल किंवा राज्य पुनर्रचना अधिनियम, १९५६ (१९५६ चा ३७) अन्वये त्या विधानसभेवर निवडून आल्याचे मानण्यात आले असेल तर; किंवा

(दोन) जर तो सदस्य म्हणून असताना महाराष्ट्र विधानसभेचा सदस्य म्हणूनही चालू राहिला असेल किंवा मुंबई पुनर्रचना अधिनियम, १९६० (१९६० चा ११) अन्वये त्या विधानसभेवर निवडून आल्याचे मानण्यात आले असेल तर;

(ब) मुंबई विधानसभेचा त्या सभेवर उक्त तारखेस किंवा त्यानंतर नामनिर्देशित करण्यात आलेला सदस्य;

(क) मुंबई विधानपरिषदेचा, उक्त तारखेस किंवा त्यानंतर त्या परिषदेवर निवडून आलेला सदस्य—

(एक) जर तो सदस्य असतानाच मुंबई विधानपरिषदेचा सदस्य म्हणूनही चालू राहिला असेल किंवा राज्य पुनर्रचना अधिनियम, १९५६ (१९५६ चा ३७) अन्वये त्या परिषदेवर निवडून आल्याचे मानण्यात आले असेल तर; किंवा

(दोन) जर तो सदस्य म्हणून असतानाच महाराष्ट्र विधानपरिषदेचा सदस्य म्हणूनही चालू राहिला असेल किंवा मुंबई पुनर्रचना अधिनियम, १९६० (१९६० चा ११) अन्वये त्या विधानपरिषदेवर निवडून आल्याचे मानण्यात आले असेल तर;

(ड) मुंबई विधानपरिषदेचा त्या परिषदेवर उक्त तारखेस किंवा त्यानंतर नामनिर्देशित करण्यात आलेला सदस्य आणि त्यामध्ये १ जानेवारी १९४६ रोजी किंवा त्यानंतर जी व्यक्ती ज्या कोणत्याही प्रांताचे किंवा कोणत्याही राज्याचे (भारतीय संस्थान धरून) क्षेत्र किंवा त्याचा कोणताही भाग महाराष्ट्र राज्याच्या कोणत्याही भागामध्ये अंतर्भूत होत असेल अशा प्रांतासाठी किंवा राज्यासाठी रचना करण्यात आलेल्या (कोणत्याही नावाने संबोधल्या जाणाऱ्या) कोणत्याही विधानसभेची किंवा विधानपरिषदेची निर्वाचित किंवा नामनिर्देशित सदस्य होती त्या कोणत्याही व्यक्तीचा,—

(एक) जर ती व्यक्ती, अशा ज्या कोणत्याही विधानसभेच्या किंवा विधानपरिषदेच्या कोणत्याही प्रादेशिक मतदारसंघाचे क्षेत्र किंवा त्याचा कोणताही भाग देखील महाराष्ट्र राज्याच्या कोणत्याही भागामध्ये अंतर्भूत असेल अशा मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी निवडून देण्यात आलेली असेल तर;

(दोन) जर तिला प्रादेशिक मतदार संघाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी निवडून देण्यात आलेले असेल किंवा ती नामनिर्देशित सदस्य असेल आणि तिच्या, कोणत्याही अशा विधानसभेवरील किंवा विधानपरिषदेवरील निवडणुकीच्या किंवा यथास्थिती नामनिर्देशनाच्या वेळी ती जेथे राहात होती किंवा तिचा व्यवसाय करत होती ती जागा, महाराष्ट्र राज्याच्या कोणत्याही भागामध्ये असेल तर, समावेश होईल.

(२) राज्य विधानमंडळाच्या सदस्याच्या संबंधात " पदावधी " म्हणजे असा सदस्य म्हणून त्याची निवड किंवा नामनिर्देशन या संबंधीची अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेस सुरू होणारी आणि ते पद रिक्त होण्याच्या तारखेस संपणारी मुदत.

**स्पष्टीकरण एक.**—विधानसभेची सार्वत्रिक निवडणूक झाली असेल आणि कोणत्याही कारणासाठी कोणत्याही मतदारसंघात निवडणूक झाली नसेल आणि त्याच्यानंतर झालेल्या निवडणुकीत त्या मतदारसंघात एखादा सदस्य निवडून आला असेल तर त्या सदस्याच्या बाबतीत पदावधी हा, इतर मतदारसंघातील सार्वत्रिक निवडणुकीचा निकाल ज्या तारखेस **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध झाला असेल त्या तारखेस सुरू झाला असे समजण्यात येईल.

**स्पष्टीकरण दोन.**—राज्य शासनाने **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे मान्य केलेल्या कारणासाठी किंवा कारणांसाठी राज्य विधानमंडळाच्या कोणत्याही सदस्याने आपल्या पदाचा राजीनामा दिला असेल त्या बाबतीत त्याच्या पदाच्या मुदतीची गणना करण्याच्या प्रयोजनासाठी, त्याने राजीनामा दिला नसता तर जितक्या मुदतीसाठी तो सदस्य म्हणून राहिला असता ती

मुदत जमेस धरण्यात येईल आणि त्याने त्या कालावधीसाठी देखील सदस्य म्हणून सेवा केली असे समजण्यात येईल :

परंतु असे की, तद्नुसार विचारात घ्यावयाची कमाल मुदत ही कोणत्या सदस्याच्या बाबतीत सहा महिन्यांपेक्षा अधिक असणार नाही :

परंतु आणखी असे की, एक भाषिक महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीसाठीच्या आंदोलनास पाठिंबा देण्याकरिता एखाद्या सदस्याने आपल्या पदाचा राजीनामा दिलेला असल्यास, असा राजीनामा हा, या स्पष्टीकरणाच्या प्रयोजनार्थ मान्यता देण्यात आलेल्या कारणास्तव दिलेला राजीनामा असल्याचे मानण्यात येईल. आणि पहिल्या परंतुकात काहीही असले तरी, अशा कारणास्तव आपल्या पदाचा राजीनामा देणाऱ्या सदस्यांच्या बाबतीत, त्याचा पदावधी मोजताना, त्याने असा राजीनामा दिला नसता तर जेवढ्या मुदतीकरिता तो त्या पदावर राहिला असता, तो संपूर्ण पदावधी विचारात घेण्यात येईल आणि त्या मुदतीत देखील त्याने सदस्य म्हणून काम केले असल्याचे मानण्यात येईल.

**स्पष्टीकरण तीन**.—ज्या बाबतीत भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १७२, खंड (१) च्या उपबंधान्वये ज्या तारखेस कोणत्याही विधानसभेची मुदत संपली असती त्या तारखेपूर्वी, परंतु सहा महिन्यांपेक्षा अगोदरची नसेल अशा वेळी विधानसभा विसर्जित करण्यात आली असेल त्या बाबतीत तिच्या कोणत्याही सदस्याचा पदावधी मोजण्याच्या प्रयोजनासाठी, जर विधानसभा अगोदर विसर्जित करण्यात आली नसती तर, तो जेवढ्या मुदतीत विधानसभा सदस्य म्हणून राहिला असता तेवढी मुदत विचारात घेण्यात येईल. आणि त्याने त्या मुदतीत देखील सदस्य म्हणून काम केले असल्याचे मानण्यात येईल :

परंतु या स्पष्टीकरणात काहीही अंतर्भूत असले तरीही, महाराष्ट्र विधानसभा ज्या तारखेस विसर्जित करण्यात आली त्या १७ फेब्रुवारी १९८० या तारखेस विद्यमान सदस्य असलेल्यांच्या बाबतीत, विधानसभा अशाप्रकारे विसर्जित झाली नसती तर ज्या कालावधीत तो विधानसभेचा सदस्य राहिला असता, तो कालावधी, त्या सदस्याचा पदावधी मोजताना जमेस धरला जाईल आणि त्याने त्या कालावधीतही सदस्य म्हणून काम केल्याचे मानण्यात येईल :

" परंतु आणखी असे की, या स्पष्टीकरणामध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, ज्या दिनांकास महाराष्ट्र विधानसभा विसर्जित करण्यात आली त्या १५ जुलै १९९९ या दिनांकास विद्यमान असलेल्या सदस्याच्या बाबतीत जर जिचे अशा प्रकारे विसर्जन झाले नसते तर असा सदस्य ज्या कालावधीसाठी विधानसभेचा सदस्य म्हणून पुढे चालू राहिला असता तो कालावधी अशा सदस्याच्या पदावधीची गणना करताना विचारात घेण्यात येईल, आणि त्याने त्या कालावधीसाठी देखील सदस्य म्हणून सेवा केली असल्याचे मानण्यात येईल.".

**स्पष्टीकरण चार**.—खंड (१) च्या परिच्छेद (क) व (ड) मध्ये उल्लेख केलेल्या मुंबई विधानपरिषदेच्या कोणत्याही सदस्याचा पदावधी लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ च्या

कलम १५६ अन्वये कमी करण्यात आला असेल आणि त्याच्या नेहमीच्या पदावधीच्या समाप्तीपूर्वी त्यास निवृत्त करण्यात आले असेल त्या बाबतीत त्याने ज्या कालावधीत असा सदस्य म्हणून काम केले असेल तो कालावधी, या अधिनियमाच्या कलम ३ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी विचारात घेण्यात येईल आणि असा सदस्य म्हणून त्याने काम केलेल्या एका पूर्ण वर्षाच्या प्रत्येक कालावधीसाठी दरमहा सहा हजार इतके निवृत्तिवेतन त्यास देण्यात येईल.

३. **सदस्यांना देय असलेले निवृत्तिवेतन.**—(१) राज्य विधानमंडळाच्या कोणत्याही सभागृहाचा सदस्य म्हणून निवडून आलेल्या अथवा नामनिर्देशित झालेल्या व्यक्तीने, ज्यानी " सदस्य " म्हणून शपथ घेतली आहे. अथवा घेतल्यास, अशा व्यक्तीस, दरमहा रुपये ६,००० निवृत्तीवेतन देण्यात येईल :

परंतु, असे की, ज्यावेळी एखाद्या व्यक्तीने ५ अथवा ६ वर्षांची जी असेल ती मुदत, त्यापेक्षा जास्त मुदतीसाठी सेवा केली असेल, त्या सदस्याला, त्याच्या पूर्ण मुदतीपेक्षा जास्त मुदतीच्या प्रत्येक वर्षासाठी दरमहा ५०० पाचशे या प्रमाणात जादा निवृत्तिवेतन दिले जाईल :

परंतु आणखी असे की, जर एखादी व्यक्ती विधिमंडळाचा सदस्य म्हणून अपात्र ठरल्यास, त्यास निवृत्तीवेतन अनुज्ञेय राहणार नाही.

(२) पोट-कलम (१) च्या प्रयोजनासाठी वर्षाची गणना करताना एखाद्या व्यक्तीने परिषदेच्या किंवा विधानसभेच्या आपल्या सदस्यत्वाच्या आधारे विधानपरिषदेचा सभापती किंवा उप सभापती किंवा विधानसभेचा अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष किंवा मंत्री, राज्यमंत्री, उपमंत्री किंवा संसद सचिव म्हणून किंवा त्यापैकी एकापेक्षा अधिक पदांवर, ज्या मुदतीत सेवा केली असेल ती मुदत जमेस धरली जाईल.

## ४. विवक्षित परिस्थितीत निवृत्तिवेतन स्थगित ठेवणे किंवा कमी करणे

(१) ज्यावेळी कलम ३ अन्वये निवृत्तिवेतनाचा हक्क असलेली कोणतीही व्यक्ती ही—

(अ) भारताच्या राष्ट्रपतींच्या किंवा उप राष्ट्रपतींच्या पदावर निवडली गेली असेल किंवा एखाद्या राज्याच्या राज्यपालांच्या पदावर किंवा एखाद्या संघराज्य क्षेत्राच्या प्रशासकाच्या पदावर तिची नेमणूक करण्यात आली असेल तर, किंवा

(ब) राज्यसभेचा किंवा लोकसभेचा किंवा एखाद्या राज्याच्या किंवा संघराज्य क्षेत्राच्या विधानभसेचा किंवा एखाद्या राज्याच्या कोणत्याही विधानपरिषदेचा सदस्य झाली असेल तर, किंवा

(क) केंद्र सरकारच्या किंवा कोणत्याही राज्य शासनाच्या मालकीच्या किंवा नियंत्रणाखाली असलेल्या कोणत्याही महामंडळाच्या किंवा कोणत्याही स्थनिक प्राधिकरणाच्या नियंत्रणाखाली वेतनावर सेवानियुक्ती झाली असेल किंवा अशा सरकारकडून, महामंडळाकडून किंवा स्थानिक प्राधिकरणाकडून कोणतेही पारिश्रमिक मिळण्याचा इतर प्रकारांनी तिला हक्क असेल तर,

ती तसे पद धारण करण्याचे किंवा असा सदस्य म्हणून असण्याचे किंवा अशाप्रकारे सेवानियुक्त असण्याचे किवा अशा पारिश्रमिकाचा तिला हक्क असण्याचे चालू राहिल या मुदतीत कलम ३ अन्वये कोणतेही निवृत्तिवेतन मिळण्याचा हक्कदार असणार नाही :

परंतु, असे की, ज्यावेळी असे पद धारण करण्यासाठी किंवा असा सदस्य म्हणून राहण्यासाठी किंवा असा सेवानियुक्त असण्यासाठी अशा सदस्याला देय होणारे वेतन किंवा खंड (क) मध्ये निर्देशिलेले पारिश्रमिक या कलम (३) अन्वये देय होणाऱ्या निवृत्तिवेतनापेक्षा कमी असेल त्यावेळी अशा व्यक्तीस उरलेली रक्कम त्या कलमाखाली निवृत्तिवेतन म्हणून मिळण्याचा हक्क राहील.

**शंका निरसन.**—शंका निरसनासाठी याद्वारे असे जाहीर करण्यात येत आहे की, या अधिनियमाद्वारे सुधारलेल्या मुख्य अधिनियमाच्या कलम २ चा खंड (२), यातील स्पष्टीकरण एक व दोन यांच्या तरतुदी, १९ जुलै १९८७ रोजी अंमलात आल्या असल्याचे मानण्यात येईल, आणि त्या तरतुदींना अनुलक्षून जो सदस्य मुख्य अधिनियमाची कलमे ३, ४ व ६ आणि त्याखाली केलेले नियम यांच्या तरतुदींना अधीन राहून, निवृत्तिवेतन मिळण्यास पात्र ठरत असेल त्याला अशा निवृत्तिवेतनाची, दिनांक १९ जुलै १९८७ पासूनची थकबाकीही मिळण्याचा हक्क असेल.

[१](२) * [ ]

(३) या अधिनियमातील कोणत्याही गोष्टीमुळे, कोणत्याही कायद्यान्वये किंवा अन्यथा, केंद्र सरकारकडून किंवा कोणत्याही राज्य शासनाकडून, किंवा केंद्र सरकारच्या किंवा राज्य शासनाच्या किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या मालकीच्या किंवा नियंत्रणास खालच्या कोणत्याही महामंडळाकडून, राज्य विधानमंडळाच्या कोणत्याही सदस्याला मिळणाऱ्या कोणत्याही निवृत्तिवेतनावर, किंवा केंद्र सरकारकडून कोणत्याही राज्य शासनाकडून स्वातंत्र्य सैनिक म्हणून मिळणाऱ्या कोणत्याही निवृत्तिवेतनावर परिणाम होणार नाही.

**४अ. सदस्याच्या विधवा पत्नीस निवृत्तिवेतन देण्याबाबत.**—(१) दिनांक १ ऑगस्ट १९८८ पासून, पोट कलम (३) च्या तरतुदीस अधीन राहून कोणताही सदस्य, सदस्य असणाऱ्या पदावधीत मरण पावल्यास, त्याची विधवा पत्नी असल्यास, तिला त्या सदस्याच्या मृत्युच्या दिनांकापासून पाच वर्षांच्या कालावधीकरिता दरमहा एक हजार रुपये एवढे निवृत्तिवेतन देण्यात येईल.

(२) ज्यास सदस्य म्हणून या अधिनियमान्वये निवृत्तिवेतन मिळत असेल किंवा कोणतेही निवृत्तिवेतन मिळण्यास जो हक्कदार असेल असा कोणताही सदस्य मरण पावल्यास, अशा सदस्याची पत्नी असल्यास, तिला १ ऑगस्ट १९९३ पासून पोट-कलम (३) च्या तरतुदीस अधीन राहून, अशा सदस्यास त्याच्या मृत्युच्या दिनांकास देय असलेल्या निवृत्तिवेतनाच्या रकमेच्या पन्नास टक्के किंवा एक हजार रुपये या दराने दोहोंपैकी अधिक असेल ती रक्कम या दराने दरमहा निवृत्तिवेतन देण्यात येईल.

---

१. पोट-कलम (२) वगळण्यात आले आहे.

(२-अ) दिनांक १ जून १९९० पूर्वी मृत्यु पावलेल्या सदस्याच्या विधवेस दिनांक १ ऑगस्ट १९९३ पासून पोट-कलम (३) च्या तरतुदीस अधीन राहून, अशा सदस्यास त्याच्या मृत्युच्या दिनांकाला जेवढे निवृत्तिवेतन देय होते त्या रकमेच्या पन्नास टक्के किंवा एक हजार रुपये या दोहोंपैकी अधिक असेल ती रक्कम या दराने दरमहा निवृत्तिवेतन देण्यात येईल.

(३) जेव्हा अशा विधवेने पुनर्विवाह केला असेल त्या बाबतीत तिने असा पुनर्विवाह केल्याच्या दिनांकापासून तिला यथास्थिती, पोट-कलम (१) (२) किंवा (२-अ) मध्ये निर्देशिलेले निवृत्तिवेतन मिळण्याचा हक्क असणार नाही.

५. **नियम व आदेश करण्याची शक्ती.**––(१) (अ) या कलमान्वये नियम किंवा आदेश करण्याच्या प्रयोजनासाठी महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सदस्यांमधून, त्या परिषदेच्या सभापतीकडून नामनिर्देशित करण्यात येतील असे पाच सदस्य आणि महाराष्ट्र विधानसभेच्या सदस्यांमधून, त्या सभेच्या अध्यक्षांकडून नामनिर्देशित करण्यात येतील असे दहा सदस्य यांची मिळून, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात येईल आणि वित्त मंत्री हा तिचा पदसिद्ध सदस्य व समिती प्रमुख असेल.

(ब) खंड (अ) अन्वये स्थापन केलेल्या संयुक्त समितीला तिच्या कार्याचे विनियमन करण्याची शक्ती असेल.

(क) वित्त मंत्री खेरीज करून, संयुक्त समितीचा सदस्य, त्याच्या नामनिर्देशनाच्या दिनांकापासून एक वर्षासाठी सदस्य म्हणून पद धारण करील आणि संयुक्त समितीतील कोणतेही रिकामे झालेले पद हे सभापती किंवा यथास्थिती अध्यक्ष यांच्याकडून नामनिर्देशनाद्वारे भरण्यात येईल.

(२) (अ) पोट-कलम (१) अन्वये स्थापन केलेल्या संयुक्त समितीस, राज्य शासनाशी विचार विनिमय करून, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम किंवा आदेश करता येतील.

(ब) विशेषकरून आणि पूर्वगामी शक्तींच्या सर्वसाधारणतेस बाध येऊ न देता अशा नियमांत किंवा आदेशांत पुढील सर्व किंवा कोणत्याही बाबींची तरतूद करण्यात येईल––

(एक) ज्या नमुन्यात आणि ज्या प्राधिकरणाकडे निवृत्तिवेतनासाठी अर्ज करण्यात येईल तो नमुना व ते प्राधिकरण;

(दोन) निवृत्तिवेतनाच्या अर्जासोबत सादर करावयाची प्रमाणपत्रे;

(तीन) निवृत्तिवेतन घेण्याच्या वेळी करावयाची प्रतिज्ञापने;

(चार) या अधिनियमाची अंमलबजावणी व कार्यान्वयन योग्यरित्या होण्यासाठी आवश्यक अशा इतर कोणत्याही बाबी.

(३) पोट-कलम (अ) अन्वये केलेले सर्व नियम किंवा आदेश हे परिषदेच्या सभापतींकडून आणि सभेच्या अध्यक्षांकडून संमत झाल्याशिवाय व त्यांनी ते कायम केल्याशिवाय आणि शासकीय राजपत्रात प्रसिद्ध केल्याशिवाय अंमलात येणार नाहीत. अशाप्रकारे नियम किंवा आदेश प्रसिद्ध करणे हे ते करण्यात आल्याचा निर्णायक पुरावा असेल.

(४) या कलमाखालील कोणतेही नियम किंवा आदेश हे या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेच्या पूर्वी नसेल अशा कोणत्याही तारखेपासून भूतलक्षी प्रभावाने असतील असे करता येतील.

(५) या कलमाखाली केलेल्या नियमांचा व आदेशांचा प्रभाव हा ते जणू या अधिनियमातच अधिनियमित केले असल्याप्रमाणे राहील.

६. **निवृत्तिवेतनाशी संबंधित प्रश्नावरील निर्णय.**—एखाद्या व्यक्तीला निवृत्तिवेतनाचा हक्क आहे किंवा नाही याविषयी किंवा निवृत्तिवेतनाच्या रकमेविषयी किंवा या अधिनियमाखाली तिला ज्या मुदतीकरिता निवृत्तिवेतन मिळण्याचा हक्क असेल त्या मुदतीविषयी कोणताही संशय किंवा वाद उद्‌भवल्यास ती बाब विचारार्थ महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सभापतींकडे आणि महाराष्ट्र विधानसभेच्या अध्यक्षांकडे पाठविण्यात येईल आणि ते राज्य शासनाशी विचारविनिमय करून त्यावर निर्णय देतील. सभापतींचा आणि अध्यक्षांचा निर्णय अंतिम राहील.

---